# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १८०/२०२४**

| **अपिलार्थी** | **प्रतिवादी** | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. अरुण रामभाऊजी राजमलवार, जुनी शुक्रवारी, मुरलीधर मंदिर जवळ, नागपूर | उपअभियंता, हनुमान नगर झोन क्र. ३, महानगर पालिका, तुकडोजी चौक, नागपूर | सहाय्यक आयुक्त, हनुमान नगर झोन क्र. ३, महानगर पालिका, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १७.०३.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १८.०१.२०२४

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १८.०१.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती न दिल्यामुळे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २५.०७.२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २५.०७.२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : नमूद केलेला नाही.

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : मी दिनांक ०९.०६.२०२३ ला सादर केलेल्या माहिती अधिकाऱ्यानुसा दिनांक ३०.०६.२०२३ ला आपल्या कार्यालयातर्फे जी माहिती प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने आपण श्री. विजय किशोरीलाल बनोदे यांना दिनांक ०८.०६.२०२३ ला अंतीम स्मरणपत्र दिलेले आहे. त्या पत्रामध्ये श्री. बनोदे यांनस सुचित करण्यात आले होते की, २४ तासाच्या आत वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, क्षेत्रीय कार्यालयात (हनुमान नगर) झोन क्र. ०३ येथे मालकी हक्काचे कागदपत्रे व बांधकामाच्या मंजूर नकाशा सादर करावा. अन्यथा पुढील कार्यवाही करण्यात आली.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर *नागपूर*

तरी श्री. विजय किशोरीलाल बनोदे यांना आपल्या कार्यालयात संबधीत कागदपत्रे जमा केली किंवा नाही याची माहिती देण्यात यावी, जमा केले असल्यास संबंधीत कागदपत्राची प्रत उपलब्ध करून देण्यात यावी.

जर कागदपत्रे जमा केली नसल्यास आपल्या कार्यालयाकडून श्री. बनोदे यांच्यावर कोणती शासकीय कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली आहे. याची सविस्तर माहिती देण्यात यावी, याबाबत माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०६.११.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०६.११.२०२३

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४.१२.२०२३ रोजी सुनावणी घेवून, १. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (सा.बा.वी.) यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज प्राप्त झाल्यानंतर पुढील ३० दिवसात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. असे दिसुन येते. करीता आदेशीत करण्यात येत की, हे आदेश प्राप्त होताच पुढील सात दिवसात विनामुल्य माहिती अपिलकर्त्यास पुरविण्यात यावी व जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांना तंबी देण्यात येत की, अश्या प्रकारची प्रशासकीय दिरंगाई, हयगत करण्यात येवू नये अन्यथा पुढील प्रशासकीय कार्यवाहीस जवाबदार राहतील. २. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांचे दिनांक २५.०७.२०२३ च्या माहिती अधिकार अर्जान्वये मागितलेली माहिती विनामुल्य द्यावी, असे आदेशीत केले.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, हनुमान नगर झोन क्र. ३, महानगर पालिका, तुकडोजी चौक, नागपूर श्री. आनंद मोखाडे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

२. आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने नमूद केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४.१२.२०२३ रोजी सुनावणी घेवून, १. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (सा.बा.वी.) यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज प्राप्त झाल्यानंतर पुढील ३० दिवसात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. असे दिसुन येते. करीता आदेशीत करण्यात येत की, हे आदेश प्राप्त होताच पुढील सात दिवसात विनामुल्य माहिती



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

अपिलकर्त्यास पुरविण्यात यावी व जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांना तंबी देण्यात येत की, अश्या प्रकारची प्रशासकीय दिरंगाई, हयगत करण्यात येवू नये अन्यथा पुढील प्रशासकीय कार्यवाहीस जवाबदार राहतील. २. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांचे दिनांक २५.०७.२०२३ च्या माहिती अधिकार अर्जान्वये मागितलेली माहिती विनामुल्य द्यावी, असे आदेशीत केले.

३. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती दिलेली नाही. त्यामुळे मागितलेली माहिती देण्याबाबत संबंधीतांना आदेशीत करावे.

६. **निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. सदर प्रकरणी अपिलार्थी श्री. अरुण रामभाऊजी राजमलवार यांनी दिनांक २५.०७.२०२३ रोजी उपअभियंता, हनुमान नगर झोन क्र. ३, महानगर पालिका, तुकडोजी चौक, नागपूर यांच्याकडे माहितीसाठी अर्ज केला होता. त्यांच्या या माहिती अर्जात मागितलेल्या माहिती नुसार त्यांनी श्री. विजय बनोदे यांना जी नोटीस पाठविली त्या नोटीसची प्रत व श्री. बनोदे यांच्या घराच्या बांधकामाच्या मंजुर नकाशाची प्रत उपलब्ध असेल तर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरविण्यात यावी, आणि जर नकाशा मंजुर नसेल तर तसे अपिलार्थी यांना लेखी स्वरुपात कळविणे क्रमप्राप्त ठरते.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, हनुमान नगर झोन क्र. ३, महानगर पालिका, तुकडोजी चौक, नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५.०७.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात श्री. विजय बनोदे यांना जी नोटीस पाठविली त्या नोटीसची प्रत व श्री. बनोदे यांच्या घराच्या बांधकामाच्या मंजुर नकाशाची प्रत उपलब्ध असेल तर अपिलार्थी यांना पुरविण्यात यावी, आणि जर नकाशा मंजुर नसेल तर तसे अपिलार्थी श्री. अरुण रामभाऊजी राजमलवार यांना लेखी स्वरुपात कळवावे, व त्याची पोहच आयोगास सादर करावी.

२. वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(गजानन निमदेव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.०३.२०२६**

30 MAR 2026

जावक क्रमांक 2432 ---------------दिनांक---------------------